**DR.BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY,**
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR -431 004
Maharashtra (India)
NAAC – Accredited "A+"
Tele. :
Office PBX: (0240) 2403399/400
B.Sc. :- (0240) 2403181
FAX : (0240) 2403199/188
TELEGRAM : BAMUSITY
WEB SITE :www.bamu.net
:http://bamua.digitaluniversity.ac.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
छत्रपती संभाजीनगर
४३१ ००४ महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे "अ +" दर्जा प्राप्त

**संदर्भ क्र.परीक्षा/बी.एस्सी./प्रा./२०२४-२५/** **दि.२१.१२.२०२४**

## स्कील बेसड् व्हर्टीकल्स्, को-करीक्युलर (हेल्थ ॲण्ड वेलनेस) तसेच अंतर्गत मूल्यमापन आणि प्रात्यक्षिक परीक्षेचे वेळापत्रक (NEP-2024)

**प्रति,**
**मा.प्राचार्य/मा. संचालक,**
सर्व संलग्नित विज्ञान महाविद्यालये,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर

**विषयः- बी.एस्सी. प्रथम सत्र (NEP-2024) स्कील बेसड् व्हर्टीकल्स्, को-करीक्युलर (हेल्थ ॲण्ड वेलनेस) अंतर्गत मूल्यमापन आणि प्रात्यक्षिक परीक्षेचे वेळापत्रकाबाबत.**
**संदर्भः- परीपत्रक क्रमांक/परीक्षा/४०/२०२३, संदर्भ क्रं. अभ्यासक्रम वि./कौशल्य आधारित अनुलंब परीक्षा/२०२३/१५६७३८४, दिनांक- २३.१०.२०२३.**

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयानुषंगाने कळविण्यात येते की, **बी.एस्सी. प्रथम सत्र (NEP-2024)** अभ्यासक्रमाच्या **डिसेंबर-२०२४** च्या घेण्यात येणाऱ्या **स्कील बेसड् व्हर्टीकल्स्, को-करीक्युलर (हेल्थ ॲण्ड वेलनेस) तसचे अंतर्गत मूल्यमापन आणि प्रात्यक्षिक परीक्षा** खालील तक्त्यात नमूद केलेल्या कालावधीत घेण्याचे ठरले असून सदरील परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दतीचे पालन करून स्कील बेसड् व्हर्टीकल्स्, अंतर्गत मूल्यमापन आणि प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात याव्यातः

| अनु.क्र. | परीक्षेचे नाव | परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|
| ०१. | स्कील बेसड् व्हर्टीकल्स्, को-करीक्युलर (हेल्थ ॲण्ड वेलनेस) परीक्षा/प्रात्यक्षिक परीक्षा तसेच अंतर्गत मूल्यमापन | दि. ०३.०१.२०२५ ते दि. ११.०१.२०२५ |

**स्कील बेसड् व्हर्टीकल्स् विषयाच्या/पेपरच्या परीक्षा उपरोक्त नमूद संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने महाविद्यालय स्तरावर उपरोक्त तक्त्यात नमूद दिनांकास घेण्यात याव्यात. यासाठीचे प्रश्नसंच हे महाविद्यालयाने संबंधित विषयाच्या मान्यताप्राप्त प्राध्यापकाकडून तयार करुन घ्यावेत तसेच परीक्षेनंतर सदरील उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन महाविद्यालयीन स्तरावर त्वरीत करण्यात येऊन लेखी व अंतर्गत परीक्षेच्या गुणांची नोंद *(Data Entry) (Assessment Data Export File)* वर करावी.**

**स्कील बेसड् व्हर्टीकल्स्, को-करीक्युलर (हेल्थ ॲण्ड वेलनेस), अंतर्गत मूल्यमापन आणि प्रात्यक्षिक परीक्षेकरीता कार्यपध्दती पुढील प्रमाणे आहे :**

१. परीक्षेचे वेळापत्रक, तुकडया (बॅचेस) हे विद्यापीठाच्या प्रचलीत नियमाप्रमाणे तयार करावे व वेळापत्रक विद्यार्थ्यांसाठी सूचना फलकावर लावावेत.

२. बी.एस्सी. प्रथम वर्ष, (NEP-2024) प्रथम सत्राचे वार्षीक प्रात्याक्षिक परीक्षेसाठी बहिस्थ परीक्षक (External Examiner) अनिवार्य आहे.

३. प्रात्याक्षिक परीक्षेसाठी बहिस्थ परीक्षक म्हणुन शक्य तो नजिकच्या महाविद्याल्यातील अध्यापकाची नेमणुक करावी.

४. प्रात्यक्षिक परीक्षेचे आणि इतर देयके विद्यापीठाच्या प्रचलित नियमाप्रमाणे देण्यात येतील.

५. **स्कील बेसड् व्हर्टीकल्स्, को-करीक्युलर (हेल्थ ॲण्ड वेलनेस) अंतर्गत मूल्यमापन आणि प्रात्यक्षिक परीक्षेच्या** गुणयाद्या ***(Mark List)*** परीक्षकाने मूल्यमापन करुन संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे त्वरीत हस्तांतरीत कराव्यात, तद्नंतर प्राचार्यांनी गुणयाद्या ***Data Entry*** करीता महाविद्यालयाच्या परीक्षा प्रमुखांकडे तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात.

६. **बी.एस्सी. (NEP-2024)** (प्रथम सत्र) अंतर्गत मूल्यमापन / प्रात्यक्षिक परीक्षेच्या गुणयाद्या ***ADES (Assessment Data Export File)*** वर ***Data Entry*** करून ***(www.bamua.digitaluniversity.ac)*** या संकेतस्थळावर निकाल घोषित करण्याकरिता उपलब्ध झाल्याबाबतची खात्री करूनच हार्ड कॉपी प्रिंट ***(Hard Copy Print)*** संबंधीत परीक्षक/नियामक व **प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह लेखी परीक्षेच्या गुणयाद्यांसोबत फाईल्समध्ये परीक्षार्थींच्या उपस्थिती अहवालासहित परीक्षा विभागातील संबंधीत कक्षाकडे विहित मुदतीत सादर करावे.**

७. **स्कील बेसड् व्हर्टीकल्स्, को-करीक्युलर (हेल्थ ॲण्ड वेलनेस) अंतर्गत मूल्यमापन आणि प्रात्यक्षिक परीक्षांच्या** गुणयाद्या विहित मुदतीत विद्यापीठास पाठविण्याची जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांवर राहील. उपरोक्त नमूद गुणयाद्या या विहित मुदतीत सादर न केल्यास दिनांक- १४.१२.२०२१ (संदर्भ क्र.:परीक्षा/समन्वय/२०२१/१४०२-१२) रोजी झालेल्या **परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील प्रस्ताव क्रं- ६ नूसार निकाल लागल्याच्या दिनांकापासून पहिले १० दिवस रु.२०००/- (अक्षरी रु. दोन हजार फक्त) प्रति विद्यार्थी आणि नंतरच्या ५ दिवसांसाठी रु . ३०००/- (अक्षरी रु. तीन हजार फक्त) प्रति विद्यार्थी दंड आकारुन निकाल घोषित करण्यात येईल तद्नंतर कुठल्याही सबबीवर कोणताही बदल केला जाणार नाही** याची नोंद घ्यावी.

८. परीक्षकाने आसन क्रमांकानुसार वर्गनिहाय/वर्षनिहाय गुणयाद्या स्वतंत्ररित्या तयार कराव्यात.

९. प्राचार्यांनी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय परीक्षार्थींना प्रात्यक्षिक परीक्षेकरीता इतर महाविद्यालयात ***(Out of Turn)*** पाठविण्यात येऊ नयेत.

DR.BABASAHEB AMBEDKAR
MARATHWADA UNIVERSITY,
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR -431 004
Maharashtra (India).
NAAC – Accredited "A+"
Tele. :
Office PBX: (0240) 2403399/400
B.Sc. :- (0240) 2403181
FAX : (0240) 2403199/188
TELEGRAM : BAMUSITY
WEB SITE :www.bamu.net
:http://bamua.digitaluniversity.ac.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर
४३१ ००४ महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे "अ +" दर्जा प्राप्त

१०. प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयात **स्कील बेसड् व्हर्टीकल्स्, को-करीक्युलर (हेल्थ ॲण्ड वेलनेस), अंतर्गत मूल्यमापन आणि प्रात्यक्षिक परीक्षा** विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त परीक्षकांमार्फत घेतल्याचे प्रमाणपत्र गुणयाद्यांबरोबर विद्यापीठाच्या संबंधित कक्षाकडे पाठवावे.

११. प्राचार्य/संचालकांना विनंती की, परीक्षा विभागात परीक्षेसंबंधी पाठवावयाच्या दस्तऐवजांच्या प्रत्येक पानावर वरच्या बाजूला कोपऱ्यात परीक्षा केंद्र क्रमांक असलेला शिक्का लावावा अन्यथा दस्तावेज गठ्ठयातून निखळल्यास/गहाळ झाल्यास या कार्यालयाची जबाबदारी राहणार नाही.

१२. बी.एस्सी. (प्रथम सत्र) (NEP-2024) **स्कील बेसड् व्हर्टीकल्स्, को-करीक्युलर (हेल्थ ॲण्ड वेलनेस) आणि प्रात्यक्षिक परीक्षा** या परीपत्रक क्रमांक/परीक्षा/४०/२०२३, संदर्भ क्रं. अभ्यासक्रम वि./कौशल्य आधारित अनुलंब परीक्षा/२०२३/१५६७३८४, दिनांक- २३.१०.२०२३ अन्वये महाविद्यालयीन स्तरावर आयोजित करावयाची असल्याने **सदरील विषयाच्या उत्तरपत्रिका हया विद्यापीठात जमा न करता महाविद्यालयातच जतन करुन ठेवाव्यात.**

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ